नि.दि.दा.नं. ६१७/२००५.

निशाणी क्र. खाली.

**वादी तर्फे विधिज्ञ श्री. सी.एस.कुलकर्णी यांचेकडुन साक्षीदाराचा पुढील सरतपास शपथेवर सुरु–**

२. माझ्या शपथपत्रातील मजकूर माझे वकीलांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला असून त्यावर माझी सही आहे. शपथपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे. दावा मिळकतीचा गट क्र. १७५ असून क्षेत्रफळ ५३ आर आहे. सदर मिळकत मी चंदु गणपती शितोळे यांचेकडून विकत घेतलेली आहे. सदर क्षेत्र मी दोन वेळा विकत घेतले आहे. ते सन २००२ आणि २००४ मध्ये घेतले होते. आता मला सदर दिनांक ०५/०३/२००२ रोजीचे मुळ खरेदीखत दाखवण्यात आले. त्यावर खरेदीखत लिहून देणार म्हणून चंदु गणपती शितोळे व लिहून घेणार म्हणून माझे नाव आहे. त्यातील मजकूर खरेदी लिहून देणार चंदू शितोळे यांचे सांगण्याप्रमणे लिहीलेला असून त्यावर त्याचा निशाणी अंगठा व माझी सही आहे. त्यावर साक्षीदार म्हणून उत्तम यशवंता माळी, विलास भिमराव शितोळे व महादेव चंदु शितोळे हे हजर होते. त्यांनी सुद्धा सदर खरेदीखतावर माझ्या समक्ष सह्या केलेल्या आहेत. त्या मी ओळखतो. सदर खरेदीखतातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ८५** देण्यात येते. आता मला सदर दिनांक १४/०५/२००४ रोजीचे मुळ खरेदीखत दाखवण्यात आले. त्यावर खरेदीखत लिहून देणार म्हणून चंदु गणपती शितोळे व लिहून घेणार म्हणून माझे नाव आहे. त्यातील मजकूर खरेदी लिहून देणार चंदू शितोळे यांचे सांगण्याप्रमाणे लिहीलेला असून त्यावर त्याचा निशाणी अंगठा व माझी सही आहे. त्यावर साक्षीदार म्हणून विठ्ठल बाबुराव शितोळे व व्यंकट गणपती शितोळे हे हजर होते. त्यांनी सुद्धा सदर खरेदीखतावर माझ्या समक्ष सह्या केलेल्या आहेत. त्या मी ओळखतो. सदर खरेदीखतातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर खरेदीखत हे २७ आर क्षेत्राबाबतचे आहे. त्यास **नि.क्र. ८६** देण्यात येते. वाद मिळकतीच्या दक्षिणेस प्रतिवादी रंगनाथ शितोळे यांची जमीन आहे. त्याचा गट क्र. १७६ असा आहे. सदर गट क्र. १७५ व १७६ दरम्यान पुर्वापार पासुनचा बांध होता. सदरचा बांध हा प्रतिवादीने नष्ट केला होता. त्या बाबत मी तहसील कार्यालयात रितसर तक्रार दाखल केली होती. आता मला सदर तक्रार दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ८७** देण्यात येते. सदर तक्रार दाखल केल्यानंतर मोका पाहणी करण्यासाठी मंडळअधिकारी व तलाठी हे आले होते. त्यांनी घटनास्थळावर पंचनामा तयार केला होता. त्यावेळी मी प्रत्यक्ष हजर होतो. तसेच इतर साक्षीदार नामे नागनाथ विश्वनाथ माळी, बाजीराव यशवंता लामतुरे, भारत गोविंद माळी, उत्तम यशवंत माळी, गोपिचंद संभाजी माळी हे सुध्दा पंच म्हणून हजर होते. त्यांनी सदर पंचनाम्यावर माझ्या समक्ष सह्या केलेल्या आहेत. त्यावेळी प्रतिवादी साहेबराव हे सुध्दा हजर

होते. परंतु, त्यांनी सदर पंचनाम्यावर सही करण्यास नकार दिला होता. सदर पंचनाम्यातील मजकूर हा संबंधीत मंडळ अधिकारी यांनी आमच्या समक्ष लिहीलेला असून तो खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. ८८** देण्यात येते. सदर पंचनामा झाल्यानंतर संबंधीत मंडळ अधिकारी यांनी तहसीलदार कळंब यांना अहवाल दाखल केला होता. आता मला सदरचा अहवाल दाखवण्यात आला. तो तोच आहे. त्यास **नि.क्र. ८९** देण्यात येते. सदर अहवालानुसार दोन्ही शेताचे दरम्यान असलेला बांध हा नष्ट करण्यात आल्याचे नमुद करण्यात आले आहे. सदर तक्रार अर्जानुसार प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी यांना सदरहू बांध पुर्ववत करण्यासंदर्भात तहसीलदार यांनी नोटीस काढून फर्मावले होते. परंतु, त्यांनी सदरहू बांध पुर्ववत केला नाही. त्यामुळे मी पुन्हा तहसील कार्यालयात तक्रार दिली होती. आता मला सदर तक्रारीची मुळ प्रत दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ९०** देण्यात येते. त्या अर्जावरुन तहसीलदार कळंब यांनी प्रतिवादीस नोटीस पाठवून बांध पुर्ववत करण्यासंदर्भात फर्मावले होते व न केल्यास १००/– रुपयांचा दंड ठोठावल्या जाईल असे सुध्दा त्यांना निर्देशित केले होते. ती नोटीस आता मला दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यास **नि.क्र. ९१** देण्यात येते.

३. सदर बांध फोडून प्रतिवादी यांनी माझे गट क्र १७५ वर ८ आर अतिक्रमण केले होते. सदर अतिक्रमण निश्चित व्हावे म्हणून मी या प्रकरणात मोजणी अधिकारी नियुक्त व्हावा म्हणून अर्ज सादर केला होता. त्या प्रमाणे मोजणीदाराची नेमणुक होउन न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे संबंधीत अधिकारी मोजणी कामी मोक्यावर आले होते. सदर मोजणीच्या संदर्भात मला संबंधीत अधिकाऱ्यांनी नोटीस पाठविली होती. त्याप्रमाणे मी निश्चित तारखेस हजर झालो होतो. त्यावेळी प्रतिवादी सुध्दा मोक्यावर हजर झाले होते. त्या मोजणीत १३ आर अतिक्रमण प्रतिवादीने माझ्या मालकीच्या शेतावर केल्याचे निष्पन्न झाले होते.

**उलट तपासणी प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. बी.एन.लोमटे यांचे तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

RAVINDRA PRALHAD BATHE
Digitally signed by RAVINDRA PRALHAD BATHE
Date: 2022.12.17 13:17:44 +0530

दिनांक :– १७/१२/२०२२.

**(आर.पी.बाठे)**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कळंब.